“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। प्रयत्ने वसति लक्ष्मीः।।

मूल्य रु. ५

क्रमांक ४ वर्ष : ४० जानेवारी - मार्च २०२०

**BOOK POST**

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## ठाणे मंचतर्फे एक दिवसाची सहल

दिनांक : रविवार १२ जानेवारी — प्रस्थान : ठाणे, मुंबई

आकार : ₹ ७०० (आपल्या बँकेच्या नौपाडा शाखा, खाते १८१६ मध्ये भरण्याची सोय.)

स्थळ : कृष्णा रिसोर्टस मालजी पाडा, मुंबई वसई हायवे

| सुरेश पालेकर | अरुण वाघ | राजेश दिवेकर |
|---|---|---|
| ९९६९४५५३७० | ९८२०३७७१०२ | ९६१९३६२४६० |

## ठाणे मंचतर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी शिबीर

**दिनांक : मार्चच्या पहिल्या पंधरवड्यात**

**(दोन दिवस एक रात्र)**

**शुल्क : अंदाजे ₹ ३५०० प्रत्येकी**

**स्थळ : १२ जानेवारीनंतर कळविण्यात येईल**

**मर्यादित जागा, प्रथम नोंदणीस प्राधान्य**

**संपर्क**

| सुरेश पालेकर | अरुण वाघ | राजेश दिवेकर |
|---|---|---|
| ९९६९४५५३७० | ९८२०३७७१०२ | ९६१९३६२४६० |

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| नेहा राजेश (किरण) दिवेकर, डोंबिवली | व | विघ्नेश विकास पिकळे, मालाड |
| सायली नरेन्द्र कुलकर्णी, वांद्रे | व | आदित्य गिरीश देव, पुणे |
| प्रतीक प्रवीण नाडकर्णी, अंधेरी | व | एकता सुनील आंबेकर, मुंबई |
| रिजूल दुर्गाप्रसाद(प्रसाद) नाडकर्णी, कांदिवली | व | अवनी अरुण जैन, दिल्ली |
| श्रुती दिनेश वागळे, अंधेरी | व | सागर त्रिंबक सोमण, नेरुळ |

## तिळगूळ समारंभ - भगिनींस निमंत्रण

नेहमीचा मकरसंक्रांतीचा तिळगूळ समारंभ यंदा माहीम व ठाणे येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळांत वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य यावे ही विनंती

| | माहीम | ठाणे |
|---|---|---|
| **तारीख** | बुधवार १५ जानेवारी २०२० | बुधवार १५ जानेवारी २०२० |
| **कार्यस्थळ** | माटुंगा मित्रमंडळ<br>एफ ४, कर्नाटक बिल्डिंग,<br>मोगल लेन, माहीम. | सौ. ज्योती सुखटणकर यांच्या निवासस्थानी<br>६ संकल्प, बाजी प्रभूरोड, विष्णू नगर,<br>नौपाडा, ठाणे. ९९६७५९५१३७ |
| **वेळ** | संध्याकाळी ५ ते ७ | संध्याकाळी ४.३० ते ७.०० |
| | **संघ कार्यकारिणीतर्फे** | **सांस्कृतिक मंचतर्फे** |
| | किशोरी अ. वागळे, निलीमा श. नाडकर्णी | ज्योती कि. सुखटणकर, सुरेखा सु. पालेकर |

# संपादकीय

## समाजसेवानिधीचा विनियोग

मुखपत्रिकेच्या प्रत्येक अंकात संघाला व एज्युकेशन सोसायटीला मिळालेल्या देणग्यांचा तपशील देण्यांत येतो. या देणग्यांचा विनियोग कसा होतो व गरजू व्यक्तींना किती साहाय्य दिले जाते ही माहिती सर्व वाचकांना वेळोवेळी कळविणे हें आमचे कर्तव्य आहे.

संघासाठी नमूद करायचे म्हणजे संस्थेला मिळणाऱ्या देणग्यांची रक्कम विविध बँकांमध्ये ठेवीच्या रूपाने गुंतविण्यांत येते. अशा ठेवीवरील वार्षिक व्याज व इतर किरकोळ देणग्या हे त्या वर्षाचे उत्पन्न म्हणून गणले जाते. व्यवस्थापन, मुखपत्रिका, स्नेहसंमेलन इत्यादींचा खर्च वजा जाता राहिलेले उत्पन्न गरजूंना आर्थिक साहाय्य देण्यासाठी वापरले जाते. सध्यां कुटुंबांत एकच व्यक्ती असलेल्या गटांत २८ लाभार्थींना मासिक रु ३६००, कुटुंबांत आणखी एक व्यक्ती असलेल्या गटांत १६ लाभार्थींना रु. ४१०० व कुटुंबांत आणखी दोन किंवा अधिक व्यक्ती असलेल्या गटांत ४ लाभार्थींना रु ४६०० याप्रमाणे त्रैमासिक पद्धतीने साहाय्य दिले जाते. त्याशिवाय १८ अतिज्येष्ठ निराधार व्यक्तींना मासिक रु. ४७०० एवढे साहाय्य दिले जाते. वर्षाच्या शेवटी आढावा घेऊन वाढीव एकरकमी मदत दिली जाते. गतसाली साहाय्याप्रीत्यर्थ ३२,२९,००० रुपयांचे वितरण झाले.

वैद्यकीय साहाय्या अंतर्गत १८-१९ या वर्षांत २७ कुटुंबाना सुमारे सव्वासात लाख रुपये एवढे साहाय्य देण्यांत आले त्यांत किरकोळ आजारपणाशिवाय डायलिसीस, बायपास, कर्करोग अशा प्रकारच्या महागड्या खर्चाचे दडपण असणाऱ्या रुग्णांचाही सहानुभूतीने विचार केला जातो.

समाज बांधवांनी उदार हस्ते दिलेल्या देणग्यांमुळेच हे साहाय्य देणे शक्य झाले. त्यासाठी मंडळ त्यांचे आभारी आहे.

नूतन वर्षानिमित्त सर्व ज्ञातिबांधवांना हार्दिक शुभेच्छा!

०१.०१.२०२०

## विवाहाचा सुवर्णमहोत्सव गाठणाऱ्या जोडप्यांना वार्षिक स्नेहसंमेलनात स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीमती प्रीती (कुमुद) | व | श्री. शरद मारुती (मता) बोरकर | कारवार |
| श्रीमती गीता | व | श्री. हरीहर नारायण दळवी | बोरीवली |
| श्रीमती शांता | व | श्री. कृष्णा (अशोक) विनायक गायतोंडे | पुणे |
| श्रीमती शीला | व | श्री. अमरनाथ यशवंत गायतोंडे | पुणे |
| श्रीमती मीनल | व | श्री. अरुण यशवंत गायतोंडे | पुणे |
| श्रीमती प्रमिला | व | श्री. अजित गोपाळ महाजन | दहीसर |
| श्रीमती मंगला | व | श्री. अरुण प्रभाकर वागळे | माहीम |
| श्रीमती रेखा | व | श्री. अनिल विनायक वागळे | प्रभादेवी |

## ७५ वर्षे वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना स्मृतिचिन्हे देण्यांत आली त्यांची नावे

| | |
|---|---|
| माधवी देवीदास बोरकर | दहीसर |
| दुर्गाप्रसाद दत्तात्रय कसबेकर | अंधेरी |
| अनिरुद्ध विठ्ठल कुलकर्णी | गोरेगांव |
| माधव मंगेश मुझुमदार | बोरीवली |
| देवदास अनंत नाडकर्णी | माहीम |
| गिरीजा शंकर नाडकर्णी | पुणे |
| विनायक भालचंद्र पालेकर | ग्रांट रोड |
| दुर्गादास आनंदराव पिकळे | मुलुंड |
| अशोक दिनानाथ फेणे | अंधेरी |
| विनोद प्रभाकर वागळे | खार |
| ज्योत्स्ना उल्हास तेलंग | वांद्रे |
| दुर्गा सातप्पा वर्टी | मालाड |
| गिरीजा शंकर दळवी | माहीम |
| सतीश भास्कर कसबेकर | नॉर्वे |
| विठ्ठल जयवंत कुलकर्णी | पुणे |
| दिलीप माधव मुझुमदार | दादर |
| मीना महेश नाडकर्णी | ठाणे |
| नीता रमेश नाडकर्णी | अंधेरी |
| नीला मंगेश पिकळे | चेंबूर |
| श्रीपाद लक्ष्मण पिकळे | मुलुंड |
| स्मिता दुर्गादास रेगे | मुलुंड |
| रमेश बाबुराव तेलंग | जोगेश्वरी |
| आनंद पुरुषोत्तम वाघ | मुलुंड |

# प्रकाशझोत

## पद्मभूषण डॉ. पद्माकर दुभाषी यांचे आणखी एक पुस्तक प्रकाशित

पुणे येथे सध्या वास्तव्याला असलेले केंद्र सरकारमधील विद्वान प्रशासक पद्मभूषण डॉ. पद्माकर रामचंद्र दुभाषी यांना आपल्या ज्ञातीविषयी विशेष आस्था आहे. १९९५ साली संघाच्या हीरक महोत्सवी समारंभाला ते प्रमुख पाहुणे म्हणून आवर्जून उपस्थित होते. गेल्या वर्षी त्यांनी संघ व एज्युकेशन सोसायटी यांना प्रत्येकी रु. पन्नास हजार याप्रमाणे एकूण एक लाख रुपयांची देणगी दिली होती.

येत्या मार्च महिन्यांत त्यांना नव्वद वर्षे पूर्ण होतील. तरीही त्यांची बुद्धी तल्लख आहे. या उतारवयातसुद्धा त्यांनी आणखी एक पुस्तक लिहिले ते म्हणजे 'पोलिटिक्स अँड पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन'. हा ग्रंथ दिल्ली येथील 'गॅन बुक्स प्रा. लिमिटेड' यांनी प्रसिद्ध केला आहे प्रशासनासंबंधी त्यांनी आतापर्यंत अर्ध्या डझनहून अधिक ग्रंथ लिहिले आहेत.

## डॉ. लीना कसबेकर सौरवेन हिला ऑस्ट्रिया येथे पी.एच.डी.

आपल्या संघाचे एक हितचिंतक श्री. अरुण भास्कर कसबेकर यांची ज्येष्ठ कन्या डॉ. लीना ही ऑस्ट्रिया येथे एका विद्यापीठात सिनीयर लेक्चरर, इंटरनॅशनल रिलेशन्स या पदावर कार्यरत आहे. अलीकडेच नोव्हेंबर महिन्यांत तिला ऑस्ट्रियामध्ये परदेशातून आलेल्या महिलांच्या समस्येसंदर्भात संशोधन केल्याबद्दल पी.एच.डी. ही पदवी मिळाली त्याबद्दल तिचे अभिनंदन.

लीनाचा शैक्षणिक आलेख लहानपणापासून चढताच राहिला आहे. पदवी परीक्षेत मुंबई विद्यापीठांतून जर्मन विषयांत प्रथम वर्गात ती सर्वप्रथम आली होती. पुढे जे. एन्. यू दिल्ली येथून एम्.ए.च्या परीक्षेत ती जर्मन विषयांत पहिल्या वर्गात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. लीनाचा इंग्लीश, फ्रेंच, जर्मन व इटालियन भाषांमध्ये दांडगे प्रभुत्व आहे. तिने चोवीस वेगवेगळ्या जर्नल्ससाठी संपादकीय व्यवस्थापन व निबंधांचे परीक्षण केले आहे. अनेक कार्यशाळामध्ये व चर्चासत्रांत तिने भाग घेतला आहे व आपले प्रबंध सादर केले आहेत.

## गौरव पिकळे : क्रीडा स्पर्धांतून सामाजिक बांधिलकी

माहीम येथील डॉ. संगीता व डॉ. हेमंत शांताराम पिकळे यांचा कर्तबगार मुलगा गौरव हा न्यूयॉर्क येथे सॉफ्टवेअर इंजीनियर म्हणून काम करतो. तो सतत धावण्याच्या शर्यतीत भाग घेतो एवढेच नव्हे तर त्यांतून पैसे उभारतो व ते सेवाभावी संस्थांना दान करतो. मार्च २०१९ मध्ये एका ट्रायोथलॉन (समुद्रांत पोहणे १.५ किमी, सायक्लींग ४० किमी, धावणे १० किमी)शर्यतीत भाग घेऊन ५०० डॉलर्स उभारले व ती रक्कम ल्युकेमिया सोसायटीस दिली. त्यानंतरही त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या शर्यतीत भाग घेऊन हजारो डॉलर्स उभारले व सेवाभावी संस्थांस अर्पण केले. सर्वात अलीकडे म्हणजे नोव्हेंबर २०१९ त्याने ४२ किमीच्या न्यूयॉर्क मॅरेथॉन शर्यतीत भाग घेतला व ३५०० डॉलर्स एवढी रक्कम उभारली व ती पण ल्युकेमिया सोसायटीस दिली, त्याच्या क्रीडा नैपुण्यातून घडणाऱ्या सेवाभावी उपक्रमाबद्दल

२४ नोव्हेंबर २०१९ रोजी भरलेल्या स्नेहसंमेलनात कौतुकाची थाप म्हणून त्याचा जाहीर सत्कार करण्यात आला.

## कु. आर्या वर्टी हिला के (पू) विभागांत आंतरशालेय एकपात्री अभिनय स्पर्धेत दुसरा क्रमांक

पारले येथे राहणारे सौ. साधना व श्री. रवींद्र गजानन वर्टी यांची बारा वर्षाची कन्या कु. आर्या ही पारले टिळक विद्यालयामध्ये सातवीची विद्यार्थीनी. अलीकडे मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातर्फे एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन केले होते. लहान गटांत (इयत्ता ५ ते ७) ती शाळेमध्ये पहिली आली. मग के (पू) विभागात (पारले, अंधेरी, जोगेश्वरी) तिने शाळेचे प्रतिनिधीत्व केले. या विभागीय स्पर्धेत शेकडो शाळांनी भाग घेतला होता. आर्याने मराठी भाषेत सरोजिनी नायडू यांचा अभिनय केला व तिला दुसरा क्रमांक मिळाला व सोन्याने मढवलेली एक अत्यंत आकर्षक ट्रॉफी मिळाली. पुढे झोनल भागांतही तिला यश मिळावे ही शुभेच्छा.

## ज्ञातीचे वार्षिक संमेलन

दरवर्षी भरणारे आपल्या ज्ञातीचे स्नेहसंमेलन यंदा २४ नोव्हेंबर १९ रोजी दादर येथील सेंट अँटोनिओ डिसिल्वा हायस्कुलच्या सभागृहात उत्साहात पार पडले. कार्यक्रमाची सुरवात श्रीमती प्रज्ञा वागळे यांच्या छानशा गणेशस्तवनाने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. विवेक श्रीपाद बोरकर आणि संघाच्या व सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी दीपप्रज्वलन केले. मुख्य कार्यक्रम सुरु होण्यापुर्वी गतवर्षी दिवंगत झालेल्या ज्ञातिबांधवाना श्रद्धांजली वाहण्यात आली व नंतर संघ, सोसायटी, ठाणे मंच व मुंबई मंच कार्यकारीणीच्या सभासदांची ओळख करुन देण्यांत आली.

संघाचे अध्यक्ष श्री. मारुती दळवी यांनी संघाच्या कामाचा वर्षभराचा आढावा घेतला तसेच सोसायटीचे अध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी यांनी सोसायटीच्या कामाचा आढावा घेतला.

संघाचे उपकार्याध्यक्ष श्री. शिरीष वाघ यांनी प्रमुख पाहुणे डॉ. विवेक बोरकर यांचा थोडक्यात परिचय करुन दिला. डॉ. बोरकर यांना श्री. मारुती दळवी व श्री. देवदास नाडकर्णी यांच्या हस्ते मानचिन्ह तसेच पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

विज्ञान जगतात मानाचा असा समजला जाणारा 'शांतीस्वरुप भटनागर' पुरस्कार प्राप्त झालेले अतिशय विद्वान व नम्र प्राध्यापक डॉ. विवेक बोरकर यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मोलाचा उपदेश केला. ते म्हणाले "आपल्याला काय आवडते, जमते ते पारखूनच डोळसपणे आपापले क्षेत्र निवडा, व्यवसाय करतानाही विचारपूर्वक निर्णय घ्या" तसेच अनेक देशात भेटी दिल्याने तेथील मत्स्य आस्वादाचाही उल्लेख त्यांनी मिस्किलपणे केला, आणि सर्व उपस्थितांशी जवळीक साधली.

7 Green Solar System या कंपनीचे कर्तबगार Chairman श्री. अक्षय प्रद्योत

बोरकर यांचा त्यांच्या नेत्रदीपक कामगिरीची श्री. राजीव गायतोंडे यांनी ओळख करुन दिली. व मग त्यांचा पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. श्री. बोरकर यांनी त्यांच्या यशात सहभागी असलेल्या सर्व सहृदांचे मनापासून आभार मानले.

आपल्या ज्ञातीतील हुशार विद्यार्थांचा उल्लेखनीय नैपुण्याबद्दल विशेष सत्कार करण्यात येतो. यावर्षी सात विद्यार्थ्यांना निवडण्यात आले पण काही कारणास्तव विजयनरसिंह नाडकर्णी व गौरव पिकळे या दोनच विद्यार्थ्यांनी हजेरी लावली,

1. Atharva Nitin Pikale - HSC for getting 100/100 in Maths and in Chemistry.
2. Vijaynarsimha Shivanand Nadkarni - B.Sc. Gold Medal from Amity University
3. Shweta Purnanand Palekar - M. S. from Saint Mary's college of California
4. Yash Ganesh Wagh - M.S. in Information Technology & management
5. Dr. Abhinav Dilip Pai - M.D. from Goa University
6. Smt. Sharmila Salil Nadkarni - First Female Instructor of the year in karate
7. Gaurav Hemant Pikale - Completing 42 km Marathon in U.S.A.

विजयनरसिंह नाडकर्णी व गौरव पिकळे यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, मानचिन्ह व प्रशस्ती पत्रक देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर ठाणे मंच व मुंबई मंच यांच्या कार्यक्रमाच्या घोषणा करण्यात आल्या.

मध्यंतरानंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे सुवर्णजयंती गाठणाऱ्या जोडप्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. काही कारणास्तव सौ. शुभांगी विवेक बोरकर येऊ शकल्या नाहीत म्हणून सुवासिनींची ओटी सौ. रुची मांजरेकर यांनी भरली. त्यानंतर वयाची ७५ वर्षे ओलांडणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

आपली छोटी गोड स्वयंसेविका कु ऋजुता मंगेश धुमें व पारंपरिक नऊवारी शालू नेसून सुवासिनींची ओटी भरल्याबद्दल सौ. रुची मांजरेकर व सूत्रसंचालन केल्याबद्दल श्रीमती मंजिरी कुलकर्णी आणि गणेशस्तवन करुन कार्यक्रमाची सुरवात करणाऱ्या श्रीमती प्रज्ञा वागळे यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देण्यात आले.

सर्वात शेवटी एज्युकेशन सोसायटीतर्फे अनेक स्पर्धातील विजेत्यांना तसेच गेल्या वर्षात विविध परीक्षेत प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

सर्व कार्यक्रमाची सुत्रसंचालनाची जबाबदारी श्री. राजीव गायतोंडे, सौ. प्राची देसाई, श्री. राजेश दिवेकर, सौ. गीता संझगिरी व श्रीमती मंजिरी कुलकर्णी यांनी सशस्वीपणे पार पाडली.

पडद्यामागे नेहमीप्रमाणे श्रीमती मृदुला भांडारकर तसेच संघ आणि सोसायटीच्या कार्यकारिणीच्या सभासदांनी अपार कष्ट घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

**मंजिरी मनोज कुलकर्णी, ठाणे**

# ठाणे मंचची कुर्ग शिरसी कारवार सहल

सहल अथवा प्रवास या शब्दाची जादूच अशी आहे की, अगदी आबालवृद्धांपर्यंत मन हरखून जाते. असेच जेव्हा ठाणे मंचने "कुर्ग शिरसी कारवार " अशी सहल आयोजित केली तेव्हा आमच्या सर्वांची मन:स्थिती हरखून गेली व या सहलीस ज्येष्ठ नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला व "अनुभव ट्रॅव्हल्स" या कंपनीबरोबर वीस जेष्ठ नागरीकांनी १३ सप्टेंबर २०१९ रोजी मत्सगंधा या गाडीने प्रयाण केले व बघता बघता आमचा प्रवास सुरु झाला. ठाणे मंचने सर्वांची खाण्याची व्यवस्था केली. नेहमीप्रमाणे गाडीत गाण्यांच्या भेंड्या आणि विनोद करत दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता मुलकी या स्टेशनवर उतरलो. "अनुभव ट्रॅव्हल्सची" गाडी आली व तेथून आम्ही "मुडबिद्री" येथे "हॉटेल पंचरत्न" येथे १० वाजता पोहोचलो. हॉटेल रुमवर आंघोळ, गरमागरम नास्ता व कॉफी घेऊन जवळपास असलेल्या "शहाळया मारुती", "व्यंकटरमणा" या मंदिरांना भेट देऊन १२.३० वाजता हॉटेलवर परत आलो. ग्रुपमध्ये एकमेकांचा परिचय, नंतर रुचकर जेवण करुन संध्याकाळी ४.३० वाजता मुडबिद्री येथील जैन मंदिर पाहिले. या मंदिरास १००० पिलर्स असल्यामुळे या मंदिराला Thousand Pillars Temple असे म्हणतात. मुडबिद्रीला "जैन लोकांची काशी" असे संबोधितात. येथे ३५% जैन लोकांची वस्ती आहे या मंदिराला जैन लोक आवर्जून भेट देतात. नंतर "बाहुबली" मंदिरास भेट दिली. मंदिराकडे जाताना वाटेत आम्हाला अननसाची शेती, लांडोरचे थवेच्या थवे अशी निसर्गरम्य दृष्ये अनुभवायला मिळाली. भव्य अशा बाहुबली मूर्तीची उंची ४७ फूट असून हे मंदिर "कारकल" येथे आहे. त्यानंतर "कोड्याड होसनाडू" येथे अन्नपूर्णा मंदिराला भेट दिली. हे मंदिर खूपच प्रशस्त व सुंदर असून मंदिराच्या तिन्ही बाजूस सर्व देवांच्या मोठ्या तसबिरी लावल्या होत्या. गावातले लोक आपल्या शेतात पिकवलेल्या भाज्या, फळे, तांदूळ वगैरे धान्य देतात व त्याचे जेवण बनवून प्रसाद म्हणून गावजेवण घालतात. रात्री जेवण व आइस्क्रीमचा आस्वाद घेऊन सकाळी कुर्ग येथे प्रयाण केले. दुपारी १.३० वाजता कुर्गमधील "Capital Village" या रिसॉर्टवर पोहचलो कुर्ग हे Hill Station असल्यामुळे हवेत गारवा होता व आजुबाजुला घनदाट झाडी होती. संपूर्ण आसमंत हिरवागार दिसत होता. या चार दिवसात ओंकारेश्वर मंदिर, राजास सीटस्, भाग मंडला, अगस्ती ऋषीचे मंदिर, गणपती, महालक्ष्मी, शिव मंदिर कावेरी नदीचा उगम, "निसर्गधाम" येथील कुर्ग लोकांची जीवनशैली त्यांच्या वेशभूषा पुतळ्याच्या स्वरुपात मांडलेली होती. तसेच हरिणांचे कळप पाहिले. खुशाल नगरमध्ये सर्वात मोठी अशी "तिबेटीयन मोनेस्ट्री" अ‍ॅबी फॉल्स् दुबारे नेचर येथील हत्तीना कावेरी नदीमध्ये स्नान घालताना पाहिले असे हे कुर्गमधील मंतरलेले चार दिवस संपवून आम्ही

शिरसीला सकाळी ९ वाजता जाण्यास निघालो हा प्रवास जवळजवळ १२ तासांचा होता. वाटेत बसमध्ये गाण्यांच्या भेंड्या, अरुण कसबेकर यांच्या खुशखुशीत विनोदाचा आनंद लुटत व "अनुभव ट्रॅव्हल्सनी" दिलेल्या केळा वेफर, नानकटाई, करवंद यासारखे पदार्थ खात खात मजेत प्रवास करत रात्री ८.३० वाजता शिरसी येथील "ग्रीन वर्ल्ड" या रिसॉर्टवर आलो. हे रिसॉर्ट दाट झाडीत वसलेले असून येथे २०/२५ डुपलेक्स बंगले आहेत. रात्री जेवण करुन झोपलो. दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्ट करुन रॉक उत्सवला भेट दिली. ४० एकर क्षेत्रात कर्नाटकातील खेड्यातील जीवनशैली, लोकांचे राहणीमान, बारा बलुतेदार, शाळा, पाणवठा, दैनंदिन बाजार, शेती इत्यादी सिमेंट व स्टीलच्या पुतळ्याद्वारे यथार्थ दर्शन घडविले आहे. पुतळे नसून जिवंत सजीव माणसाप्रमाणे बोलके चेहरे,हावभाव पाहून मन अचंबित होते. हा एक वेगळाच अनुभव होता. संध्याकाळी शिरसी येथील ग्रामदेवता मरीकंबा या देवळाला भेट दिली. दुसऱ्या दिवशी सकाळी मुंडगोड येथील तिबेटीयन मोनेस्ट्री पाहायला गेलो. ती कर्नाटकमधील दुसरी मोठी मोनेस्ट्री आहे. तेथील सोन्याची बुद्धाची मूर्ती १० किलो वजनाची आहे. दुपारी जेवण करुन आराम केला व संध्याकाळी हाऊजी व वेगवेगळे बैठे खेळ खेळलो. सुजाता यार्दी व वैशाली दडकर या दोन बहिणीनी कोंकणी व हिंदी गाणी त्यांच्या सुमधुर आवाजात हावभावासहित पेश केली. लेकुरे उडंद झाली या नाटकातील नाट्यछटा वैशाली दडकर यांनी पेश केली. एकूण आठ दिवसाच्या प्रवासात अनुभव ट्रॅव्हल्सनी न्याहरी, दुपारचे जेवण व रात्रीचे भोजनमध्ये वेगवेगळ्या भाताचे प्रकार, भाजीचे प्रकार, भाजी, कोशिंबीरी, पचडी आणि जिभेचे माधुर्य वाढविण्यासाठी खास गोड पदार्थही समाविष्ट केलेले होते. खास करुन मत्स्याहारी लोकांची पण काळजी घेतली. त्यांच्यासाठी बांगडा, मुडदुसे, शेतका, कोळंबी यांची कारवारी पद्धतीने माशांचे प्रकार खिलवून त्यांची पण जिव्हा तृप्त केली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता कारवार येथे जाण्यास निघालो अशा या आठ दिवसाच्या सहलीची सांगता कारवार येथे झाली. रविवार असल्यामुळे कारवारच्या सातेबाजारात बहुतेक जणानी सुका बाजार, तिरफळे, वटंबाची सोलं, पातळ गुळ यांची खरेदी केली व रात्री कारवार येथे मुक्काम करुन दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मत्सगंधा गाडीने सर्वजण आपापल्या घरी आनंदाने परतलो.

**सुषमा सुबोध मुळगावकर**
९८१९८३६४७६

# आपल्या मंदिराच्या गाभाऱ्यांत प्रवेश घेण्या संबंधींच्या कालबाह्य प्रथेच्या संदर्भात

(आपल्या मंदिराच्या गाभाऱ्यांत काही व्यक्तींना प्रवेश नाकारण्याच्या प्रथेच्या विरोधात आपले एक सक्रीय ज्ञातिबांधव श्री. अरुण कसबेकर यांनी हिंदु जनजागृती समिती, सनातन संस्था, बांदोडे, गोवा यांना या संदर्भात शास्त्राधाराची याचना केली आहे. श्री. कसबेकर यांचे पत्र वाचकांच्या माहितीसाठी खाली उद्धृत केले आहे. समितीकडून उत्तर आल्यास ते पुढच्या अंकांत प्रसिद्ध करु – संपादक)

पूज्य महोदय,

माझा जन्म गौड सारस्वत ब्राह्मण कुटुंबात झाला. माझे गोत्र "कौशिक" असून आमचे कुलदैवत श्री शांतादुर्गाचे प्रमुख देवस्थान कवळें, फोंडा–गोवा येथे आहे.

माझ्या मुलाची (अतुल अरुण कसबेकर) पत्नी सुविद्य सौ. वंदना पूर्वाश्रमीची कु. वंदना रमेश कुलकर्णी ही चंद्रसेनीय कायस्थ प्रभू (CKP) ज्ञातीतील आहे.

लग्नानंतर उभयता देवीदर्शनाकरिता कवळ्याला गेले असताना, सौ. वंदनाला देवीच्या गाभाऱ्यांत केवळ गैर GSB-CKP कुळामधील असल्यामुळे प्रवेश करण्यासच मनाई करण्यात आली. त्यामुळे अतिशय नाराज होऊन अतुलने कुठल्याही देवळांतच जाणे बंद केले. या घटनेला २१ वर्षे झाली. आमची दोन्ही नातवंडे अतिशय हुशार असून अमेरीकेत शिक्षण घेत आहेत. त्यांना आमचे कुलदैवत आणि कवळ्याचे देऊळ याची काहीही माहिती नाही. त्यांनाही त्यांची आई CKP ज्ञातीतील असल्यामुळे मंदिराच्या गाभाऱ्यांत प्रवेश नाही. आम्हाला या सर्व गोष्टींची अगदी खंत वाटते.

माझ्या माहितीप्रमाणे हिंदुधर्मानुसार लग्नविधीत एक असाहि विधी असतो जेथे पत्नी आपल्या जन्मजात गोत्राचा त्याग करुन पतीच्या गोत्रात प्रवेश करते. आपल्या सनातन हिंदुधर्मानुसार ही जर योग्य प्रथा असल्यास कवळें शांतादुर्गा मंदिराचे पुजारी, ट्रस्टीज, माझ्या सुनेला देवीच्या गाभाऱ्यात पूजा करण्यापासून कसे रोखू शकतात ? अतुल वंदनाच्या लग्नांत हा विधी करण्यात आला होता.

शिवाय असेही ऐकीवात आहे की एका गौ.सा.ब्रा.च्या पत्नीला ती जन्मजात गौ.सा.ब्रा.नसल्यामुळे देवीच्या गाभाऱ्यांत प्रवेश नव्हता. पण तिच्या निधनाबद्दल बातमी कळताच, गाभाऱ्यांत पूजा करणाऱ्या सगोत्री महाजनांना पूजा थांबवून बाहेर काढण्यात आले. इतकेच नव्हे त्यांना अग्रशाळेतील वास्तव्यही सोडावे लागले. जर त्या दिवंगत महिलेला गाभाऱ्यांत पूजेकरिता प्रवेश नव्हता तर तिच्या निधनाबद्दल, तिच्या नवऱ्याच्या गोत्राच्या महाजनांना कसे सूतक लागू पडते ? हे आमच्या आकलना पलीकडे आहे.

मी स्वतः आपल्या अनेक ज्ञातिबांधवांना देवळाच्या भोवती असलेल्या अग्रशाळेत धूम्रपान, यथेच्च सुरापान तसेच सर्व प्रकारचा मांसाहार घेताना प्रत्यक्ष बघितले आहे. त्यांना देवीच्या गाभाऱ्यात पूजा करण्याचा पूर्ण अधिकार आहे. पण माझ्या सद्वर्तनीय सुनेला नाही. कारण ती पूर्वाश्रमीची सीकेपी !

मला पूर्ण खात्री आहे, अतुल वंदनाच्या देवळाच्या बहिष्काराने गौ.सा.ब्रा. ज्ञातीला किंवा देवळाला काडीचाही फरक पडणार नाही. पण मला या प्रथेचा अतिशय खेद व मनःस्ताप होत आहे. कारण मी स्वतः हिंदु धर्माचा कट्टर अनुयायी असून मला माझ्या थोर, पवित्र आणि सनातन हिंदु धर्माचा अतिशय अभिमान वाटतो. शिवाय गौडसारस्वत ब्राह्मण कुटुंबात जन्म घेतल्याने मी स्वतःला अत्यंत भाग्यवान समजतो. पण माझी मुलं, नातवंडं आपल्या गौ.सा. ब्राह्मणच नव्हे तर हिंदू धर्मापासूनच दूर जात असलेली पाहून मला एक विलक्षण हुरहूर लागली आहे.

शिवाय आजकाल आमच्या जीएसबी बांधवात खास करुन मध्यमवर्गीय तरुणांत विजातीय ज्ञातीतील मुलींबरोबर लग्न करण्यात लक्षणीय वाढ झाली आहे आणि ही चिंताजनक बाब आहे.

असे वाटते - आपला धर्मच आपल्या लोकांना जाणून-बुजून अन्यायाने दूर लोटत आहे.

आपण कृपया वरील पेचातून बाहेर पडण्याचा, हिंदु धर्माच्या तत्त्वानुसार शास्त्रोक्त मार्ग दाखविल्यास व देवळाच्या गाभाऱ्याच्या प्रवेशाबद्दलची सद्य प्रचलीत प्रथा किती अयोग्य आहे हे सिद्ध केल्यास, मी त्याप्रमाणे आमच्या परमपूज्य स्वामीजींच्या चरणांशी ही सद्यप्रथा बंद करण्याची प्रार्थना करु शकेन.

**अरुण भास्कर कसबेकर**


# SHREE HOMOEOPATHIC PHARMACY

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,
Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

# मुंबई मंच – कारवारी मेळाव्याचे निमंत्रण

‘कारवारी खाद्यमेळाव्याला’ दरवर्षी मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे प्रेरणा घेऊन यंदाही एक ‘आनंद मेळावा’ भरविण्यात येत आहे. पाककृतीशिवाय ज्यांना आपण बनविलेल्या वस्तू किंवा पदार्थ विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी ठेवायचे असतील, व ज्यांना बालगोपाळासाठी करमणुकीचे खेळ आयोजित करावयाचे असतील त्यांनाही गाळा मिळेल. इच्छुकानी त्वरीत संपर्क साधावा.

**तारीख व समय** : रविवार दि. १९ जानेवारी २०२० संध्या ५ ते ९
**कार्यस्थळ** : सरस्वती बाग, जोगेश्वरी, के. जी. एस. सोसायटी पटांगण
**आकार** : रू. १००० एका गाळ्यासाठी
**संपर्क** : गाळा आरक्षणासाठी व पाककृती ठरविण्यासाठी

**शैलेश गायतोंडे ९८६९२११०५५ (रात्रौ ७ ते १०)**

**राजू बोरकर ९८२०९१७८४१ (सकाळी १० ते १)**

**संपर्कासाठी अंतिम तारीख : १० जानेवारी २०२०**


MSIPL **MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD**

402, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital, Andheri (West), Mumbai 400 058
Tel No. 022 4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98337 22444




*A little every month grows to something significant over time!!!*
*Invest Rs.1000/- Per month & get...*

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




***Indian Equity market has given average 16% returns in last 32 years...***

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.

# श्रद्धांजली - माझे मामा श्री. प्रकाश कुलकर्णी



स्वर्गीय कै. प्रकाश त्रिम्बक कुलकर्णी - जन्म २२ मे १९४० मृत्यू १५ जुलै २०१९

माझे मामा, ह्यांना मी 'माझा मामा'असेच म्हणेन कारण एक तर कारवारी कोकणी भाषेत मामाला तुम्ही असे संबोधित नाहीत, शिवाय तो माझ्या स्वर्गीय आईचा (सौ. कमल विश्वनाथ फेणे, पूर्वाश्रमीची कमल त्रिम्बक कुलकर्णी) धाकटा भाऊ, त्यामुळे आई त्याला अरे तुरे करत होतीच त्यामुळे तीच सवय आम्हांला पण होतीच शिवाय मामा मला फारच जवळचाही होताच. अजूनही त्याला स्व. कै. हे संबोधायला मन तयार होत नाही पण काय करणार ईश्वरेच्छा बलीयसी आपण त्यापुढे हतबलच.

आमच्यासाठी एक महान व्यक्तिमत्त्व, मी, माझी बहीण आणि माझी मावस भावंडे, आम्हां सर्वांसाठी मामा म्हणजे एक ज्ञान व शक्तिपीठच म्हणावे लागेल, कारण कधीही कुठेही किंवा कसलीही माहिती/सल्ला हवा असल्यास मामा हा एक महत्वाच स्त्रोत होय. आणि तो पण नेहमी मदत करायला, उपाय सुचवायला सल्ले द्यायला तयार असे. उदाहरणे द्यायला पुष्कळ आहेत पण जागेअभावी थोडक्यातच लिहिते.

मामाला मुंबईतले कुठलेही ठिकाण विचारल्यास तो ते व्यवस्थित नकाशा काढून जवळपासच्या दुकानांची नांवे वैगैरे सांगून कुठल्या वेळी कुठली बस वा लोकल पकडायची ह्याची इत्थंभूत माहिती देत असे की तुम्हीं चुकूच शकणार नाही. परीक्षा, नोकरीचा इंटरव्ह्यु यासाठी हे तेव्हा खूप उपयुक्त होते कारण तेव्हा गूगल नकाशे, अंतरजाल हे सर्व उपलब्ध नव्हते. माझी मोठी मावशी पुष्पमाला मधुकर पिकळे (पूर्वाश्रमीची कुमुद(बेबी) त्रिम्बक कुलकर्णी) हिचे यजमान डॉ. मधुकर रामचन्द्र पिकळे (कारवारचे प्रसिद्ध डॉक्टर) यांचे निधन फार लवकर म्हणजे १९६९ साली झाले. माझी मावसभावंडे तेव्हा लहान होती. आजी-आजोबा असले तरी मामा त्यांच्यासाठी अतिशय महत्त्वाचा आधारस्तंभ होता. माझे बाबा १९८५ मध्ये ए.सी.सी. मधून स्वेच्छानिवृत्ती घेवून एक वर्षासाठी इंडोनेशियाला होते. माझी बहीण त्यावेळेला पहिल्यांदाच गरोदर होती. तेव्हा आम्ही वाशी, नवी मुंबईला राहात होतो. वाशी तेव्हा एकदमच नवीन विकसित होत होते आणि त्यामुळे डॉक्टर, हॉस्पीटल्सची माहिती नव्हती. माझ्या आईला तेव्हा खूप काळजी वाटायची. पण मामाने आणि इथे मला अगदी आवर्जून सांगावेसे वाटते, मामाबरोबर माझी मामी शुभलक्ष्मी प्रकाश कुलकर्णी (पूर्वाश्रमीची उषा विश्वेश वागळे) यांनी खूप मदत केली. बाळंत व्हायच्या आधीच ठाण्याला आपल्या घरी नेले, आधीच रजिस्ट्रेशन केले होतेच, बाळंत झाल्यानंतरही वाशीला पोचवणे, बारश्याची तयारी हे सर्व मामा-मामी मुळे व्यवस्थित पार पडले. माझी आई नेहमी म्हणत असे की आई-वडिल

गेल्यानंतर कितीतरी महिलांना माहेर नसते पण तिला तिच्या भावामुळे व भावजयीमुळे कधीच माहेर पारखे झाले नाही. आणि खरंच आहे, दरवर्षी नवीन वर्षाचा कार्यक्रम किंवा काहीही कार्यक्रम असला की आमचं मामाकडे जायचं नक्की असायचं. तिथे पत्ते, मराठी नाटकं इत्यादी माझी मामी उत्साहाने सर्व करी. आमचं आजोळही अबाधित होतं. माझे देवाला लक्ष लक्ष आभार की आम्हाला या कायम हृदयात जतन करुन ठेवण्याजोग्या आठवणी दिल्याबद्दल!

मामा अतिशय बुद्धिमान होता वाचन अगदी गाढे होते. कोणत्याही विषयावर तो सहज चर्चा करु शकत असे. मराठी आंणि इंग्रजी भाषांवर त्याचे प्रभुत्व होते. टाईम्स व लोकसत्तेतील शब्दकोडे तो लीलया सोडवीत असे. विल्सन कॉलेजला काही दिवस प्राध्यापक होता व नंतर ब्लंडेल इओमाईट गरवारे पेंट इथून मोठ्या पदावरुन निवृत्त झाला आणि त्यानंतरही कंपनी बंद झाल्यानंतर कित्येक कर्मचाऱ्यांचे भविष्य निधीचे पैसे त्याने स्वत: त्या ऑफिसमध्ये खेपा घालून मिळवून दिले. मामाचे अक्षर अतिशय सुंदर होते आणि तो हाडाचा चित्रकार होता. चित्रकला व पेंटिंग व्यवसाय म्हणून नाही केला नाहीतर नक्की खोऱ्याने पैसा ओढला असता.

मामाची दोन्ही मुलें, सूना आणि जावई सर्वांनी मामा व मामीच्या आजारपणात व्यवस्थित सांभाळ केला आहे.

अनेक आठवणी आहेत पण शब्द अपुरे पडतात. हा माझा एक लहानसा लेख कृतज्ञता व श्रद्धांजली व्यक्त करणारा. परमेश्वराजवळ हीच मन:पूर्वक प्रार्थना की मृतात्म्याला अनंत शांती लाभो व मामाच्या परिवारास व आम्हां सर्वास ह्या कदापि न भरुन येणाऱ्या नात्याची उणीव सहन करण्यास शक्ती देवो.

**मेधा विश्वनाथ फेणे**

९७६९४०६६८६

## निधन

| | | |
|---|---|---|
| मंगेश रंगराव देसाई | (व्हंडक्कल) | खार |
| दुर्गाप्रसाद (अविनाश) कृष्णा देसाई | (कडवाड) | मुलुंड |
| संदीप मंगेश देसाई | (हन्नळ्ळी) | अंधेरी |
| वर्षा (प्रभा) रामदास कुलकर्णी | (हळगे) | सांताक्रुज |
| शोभा सतीश मुझुमदार | (अंकोला) | चेन्नई |
| निर्मला भालचंद्र मुझुमदार | (अंकोला) | गोरेगांव |
| विनायक विश्वेश्वर फेणाणी | (चेंडिये) | दादर |
| सुलोचना कमलाकर वाघ | (सदाशिवगड) | पुणे |
| नीलेश विवेकानंद वागळे | (बाड) | अंधेरी |
| वसंत पुरुषोत्तम वागळे | (माजाळी) | गोरेगांव |
| स्मिता वेंकट (पूर्वाश्रमीच्या स्मिता दिनकर पिंगे) | (उळवी) | मुंबई |

# श्री शिवीं देवालय शताब्दी व वर्दे बोरकर मूळपुरुष सार्ध चतु:शताब्दी महोत्सव-वर्दे बोरकर कुटुंबीयांस निमंत्रण




Varde Borkars from Bori, Ponda Goa complete 450 years of their first Varde Mulpurush and 100 years for the present Shivim Temple at Paniwada in May 2020. To celebrate this occasion a Mahotsav will be held from 4-6 May 2020.

This is reunion of the five grandsons of the Mulpurush, thereby having a reunion after 380 years at the mother village of Bori. The Vatsa Gotri Varde BorkarsworshipIshtadevata Shree Shivim, Kuldevata as Shree Shantadurga, Kawlem & Shree Mangeshi, Mardol; Palvi as Shree Mahalaxmi and Gramdevta as Navdurga, Bori. Today all the Varde Borkars have several family names as Borkar/Borker/Borcar, Varde Borkar, Varde, Shenvi Borkar, Balvalli/Balwally/Balwalli, Idgungi, Khasnis, Achamni, Shappurkar, Kulkarni & Unkalkar and are spread all over the world. We appeal all the Varde Borkars to attend the Mahostav.

Various religious anushtans as Maharudra, Laghurudra Swahakar, Purusukta Avartan, Belaarchan will be performed at the mahotsav. Abhisheks will also be performed at Shree Shantadurga, Shree Mangesh, Shree Mahalaxmi & Shree Navadurga along with Shree Mulkeshwar. There will be an exhibition of Varde Borkar history & traditions, release of Family tree and several Varde Borkar books. Cultural Programs will showcase talents of music, dance drama, poetry, literature from the Varde Borkar clan.

All three days there will be food arrangement for the Kulavis attending the Mahotsav. We will assist all Kulavais with accommodation at various temples in Ponda area.

**Kindly contact Shri Namesh Borkar, President, Shree ShivimBorim Temple Trust at 9158885979, namesh_b@rediffmail.com or Shri Givaji Borkar – Hospitality at 9422417163,jjesgivagi@gmail.com**


www.kccgoa.in
कोमल हिरवी तृणपाती ही
अलगद झुलवी सर्वांग,
कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
उजळून जाई आनंद
अप्रतिम निसर्गाने नटलेलं
सुखसमृद्धी
मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर,
मंगेशी, फोंडा- गोवा
मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मनःशांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.
फ्लॅटस् उपलब्धः 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के
प्रॉजेक्ट मान्यताः गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्यः नामवंत वित्त संस्था
a Project by:
KCC
कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
मुंबई ऑफिसः श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला,
सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि:2683 3841/47/ 72. मोबाः 98336 36451
फॅक्सः 2683 3872 ई-मेल
kunalconstructiongoa@yahoo.in
गोवा ऑफिसः
kunalconstructiongoa@yahoo.in GOA RERA NO: PRGO05180314
फोंडा- गोवा. मोबाः 98209 33352, 98206 33321
म्हार्दोळ, फोंडा- गोवा

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

## यार्दी बंधूंकडून एज्युकेशन सोसायटीला तीन लाख रुपयांची देणगी

श्रीमती सुमन व श्री.रामतीर्थ यार्दी यांची तीनही मुले उच्चशिक्षित आहेत. मोठे डॉ. नरेन्द्र हे आयआयटी पवईचे डॉक्टरेट आहेत व ते बडोदा येथे व्यवसाय करतात. दुसरे प्रा. अनिल हे सांगली येथील वालचंद इंजिनिअरींग कॉलेजमध्ये इलेक्ट्रॉनिक्स विषयाचे प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले धाकटे श्री. उदय एम्. एस्सी असून पुणे येथे वास्तव्याला असतात. १९६०-७० दरम्यान डॉ. नरेन्द्र व प्रा. अनिल यांनी इंजीनिअरींगच्या शिक्षणासाठी आपल्या एज्युकेशन सोसायटीकडून आर्थिक साहाय्य घेतले होते.अलीकडेच कृतज्ञतेच्या भावनेतून आपली आई श्रीमती सुमन यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ तिघांनी मिळून एज्युकेशन सोसायटीला तीन लाख रुपयांची देणगी दिली आहे.

## श्रीमती अन्नपूर्णा बोरकर यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी वैद्यकीय साहाय्या प्रीत्यर्थ एक लाख एक रुपयांची देणगी

पारले (प) येथे राहणाऱ्या श्रीमती अन्नपूर्णा (ललिता) मंगेश बोरकर या अत्यंत सात्विक, कुलाचारमध्ये दक्ष व कुटुंबवत्सल गृहिणी होत्या. त्यांचे २००२ साली वयाच्या अवघ्या ५८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. अलीकडेच त्यांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झाली. त्याप्रसंगी त्यांचे अमेरिकानिवासी सुपुत्र श्री. मंदार यांनी आईच्या स्मरणार्थ वैद्यकीय सेवा सेवानिधीसाठी एक लाख एक रुपयांची देणगी दिली आहे.

## श्री संदीप वागळे यांजकडून वृद्ध सेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी

हिंदू कॉलनी येथे राहणारे श्री. माधव सीताराम वागळे हे रेकी उपचारांमध्ये प्रवीण होते. त्यांचे २१ सप्टेंबर रोजी दुःखद निधन झाले. त्यांचे चिरंजीव श्री. संदीप वागळे यांना स्टॉक मार्केटमधले तज्ज्ञ समजतात. ते 'पॉवर माय वेल्थ' या वित्त विषयासंबंधी कंपनीचे संस्थापक व प्रमुख आहेत. पूर्वी ते सीएन्बीसी आवाज वाहिनीवर तज्ज्ञ म्हणून पॅनेल चर्चेमध्ये प्रेक्षकांना त्यांचे दर्शन व्हायचे. माता ते झी बिझीनेस वाहिनीवर तज्ज्ञ म्हणून चर्चेमध्ये भाग घेतात. श्री. संदीप वागळे यांनी अलीकडेच वडिलांच्या स्मरणार्थ वृद्धसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## श्री वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ वृद्धसेवानिधीसाठी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी

माहीम येथे राहणारे श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी ज्ञातीच्या संदर्भातील विषयांत विशेष रस घेत असत. त्यांनी व त्यांच्या आप्तेष्टांनी वेळोवेळी भरघोस देणग्या दिलेल्या आहेत. गेल्या वर्षी श्री. कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांचा नातू श्री. कवीश दुर्गानंद (मच्छिंद्र) कसबेकर, नातसून श्रीमती अरुंधती व पणती कु. रिया यांनी

वृद्धसेवेसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली होती. अलीकडेच त्यांनी श्री. कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षानिमित्त श्रीमती रेखा चंद्रशेखर धुमें यांजकडून. | १,००० |
| २. | पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षानिमित्त श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून. | १५,००० |
| ३. | यमुनाताई, सपाताई व सिंधूताई या बहिणींच्या स्मरणार्थ भाऊबीजे निमित्त श्री. मंगेश शंकर बोरकर यांजकडून. | ३,००३ |
| ४. | श्रीमती प्रीता (कुमुद) व श्री. शरद मारुती बोरकर यांच्या विवाहाच्या ५० व्या वाढदिवसाप्रसंगी कन्या श्रीमती रूपाली हरी नायक यांजकडून. | ५,००० |
| ५. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २३ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| ६. | विवाहाच्या सुवर्ण महोत्सवी प्रसंगी निमित्त श्रीमती प्रमिला व श्री. अजित गोपाळ महाजन यांजकडून. | १,००१ |
| ७. | श्रीमती सिंधू सच्चिदानंद नाडकर्णी यांच्या आठव्या पुण्यतिथी प्रसंगी नाती सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून. | ५,००० |

## वृद्धसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती मीरा व श्री. गोपाळ सर्वोत्तम तेलंग यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र सर्वश्री मिलींद व निमीष यांजकडून. | ५,००१ |
| २. | श्रीमती मालती व श्री. दिनकर वामन वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती रेखा मिलींद तेलंग व मीनल सतीश बुजले यांजकडून. | ५,००१ |
| ३. | श्रीमती सुमित्रा व श्री. गुरुप्रसाद मंगेश वाघ यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती आशा आल्हाद घोळकर यांजकडून. | २५,००० |
| ४. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २३ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| ५. | श्री. प्रकाश बाळकृष्ण सुखटणकर यांजकडून खालील व्यक्तींच्या स्मरणार्थ | |
| | श्रीमती कमलाबाई बाळकृष्ण सुखटणकर | १,००१ |
| | श्री. बाळकृष्ण गणपतराव सुखटणकर | १,००१ |
| | श्रीमती रुक्मिणीबाई विठ्ठलराव इस्लूर | १,००१ |
| | श्री. अच्युत सुबराव गायतोंडे व | १,००१ |
| | श्री. दत्तात्रय गणपतराव सुखटणकर | १,००१ |
| ६. | श्री. माधव सीताराम वागळे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. संदीप यांजकडून | ५०,००० |

७. श्रीमती विमल (वत्सला) व श्री. भालचंद्र अण्णाजी वागळे यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती स्वाती व पुत्र श्री. राजन यांजकडून. ३,०००

८. श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ नातू श्री. कवीश दुर्गानंद (मच्छिंद्र) कसबेकर, नातसून श्रीमती अरुंधती व पणती कुमारी रिया यांजकडून. ५०,०००

९. श्री. मोहन रामचंद्र नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती वंदना विक्रम खोटे व नातू वरद मोंडकर यांजकडून. ५,०००

१०. श्रीमती इंदिरा मंगेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती वंदना प्रमोद नाडकर्णी यांजकडून. ७,०००

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

१. श्रीमती अन्नपूर्णा (ललिता) मंगेश बोरकर यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. मंदार यांजकडून. १,००,००१

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

१. श्रीमती सुमन रामतीर्थ यार्दी यांच्या स्मरणार्थ पुत्र सर्वश्री अनिल, नरेंद्र व उदय यांजकडून. ३,००,०००

२. श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २३ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून. १,००१

३. श्रीमती विमल (वत्सला) व श्री. भालचंद्र अण्णाजी वागळे यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती स्वाती व पुत्र श्री. राजन यांजकडून. ३,०००

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

१. श्री. प्रकाश मधुकर तेलंग — जोगेश्वरी — ५,००१

## विजूले चुटकुले


**घोव (बायलेक)** : **अगो, तूं आतां खंय आसा?**

**बायल** : **हांव तुमगेल्या हृदयांत आसा.**

**घोव** : **थंय आणी खूब बायलो उरतल्यो. तांचकडेन झगडत रावनाका**

**विजय सदानंद वागळे, ठाणे**
**९२२१६०७५७७**

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.